# <u>रे.दि.मु.नं.१५/२०१४ मधील नि.१०६ वरील आदेश</u>

(बाजीराव खोत विरुध्द वसंत खोत वगैरे)

**<u>CNRMHSN14-000052-2014</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. ७७ लगत त्यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाही हा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**वादी यांचे थोडक्यात कथन असे की,**

२. वादी यांनी निरंतर मनाईचा व मॅण्डेटरी मनाईसाठीचा दावा मे.कोर्टात दाखल केलेला आहे. नि.क्र. ३१ कडे प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी त्यांची कैफियत, म्हणणे व प्रतिदावा दाखल केलेला आहे. याकामी प्रतिवादी यांनी नि.क्र. ७७ ला सरतपासाचे ॲफिडेव्हीट दाखल केलेले आहे. सदरकामी प्रतिवादी यांचा उलटतपास सुरु झालेला आहे. तथापी, वादी यांचे वकील हे आजारी असल्यामुळे व इस्लामपूर येथे अचानक दवाखान्यात थांबावे लागल्यामुळे नेमल्या तारखेस वकीलांना हजर राहून प्रतिवादी यांचा उलटतपास पूर्ण करता आला नाही. त्यामुळे मे.कोर्टाने नो क्रॉसचा आदेश पारीत केलेला आहे.

३. सदरकामी त्याबाबत नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने वादी यांना माफी करण्यात यावी व नि.क्र. ७७ लगत झालेला नो क्रॉसचा आदेश रद्द करण्यात येऊन प्रतिवादी यांचा उलटतपास घेण्यास मे.कोर्टाची परवानगी मिळावी ही विनंती. प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही अगर त्यांच्यावर अन्याय होणार नाही याउलट वादीस उलटतपासाची संधी न मिळाल्यास वादींवर अन्याय होणार आहे व न्यायदानाच्या कामात गुंता निर्माण होणार आहे. सबब, वरील परिस्थितीचा न्याय विचार करण्यात येऊन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा ही विनंती.

**४.** प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांनी म्हणणे दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द दि. १२/११/२०२५ रोजी म्हणणे नाही असा आदेश पारीत करणेत आला. वादी, प्रतिवादीतर्फे युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादीतर्फे साक्षीदार नं. १ तर्फे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र. ७७ दि. २५/०९/२०२३ रोजी दाखल करण्यात आले. तदनंतर पुरेशी संधी देऊनही वादीतर्फे प्रतिवादीचा उलटतपास घेण्यात आला नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दि. ०४/०३/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश झाला. तदनंतर प्रतिवादीतर्फे साक्षीदार श्रीपती मोंडे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ८५ दाखल करण्यात आले. मात्र, त्यांचा उलटतपास न घेतल्याने दि. २२/११/२०२३ रोजी वादी विरुध्द सदर साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश करण्यात आला. तदनंतर वादीतर्फे नि.क्र. ८७ लगत प्रतिवादी व साक्षीदाराचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्द करण्यासाठी अर्ज देण्यात आला. सदर अर्ज खर्चासह मंजूर करण्यात आला. खर्च रक्कम दिल्यानंतर वादीतर्फे केवळ साक्षीदार श्रीपती मोंडे यांचा उलटतपास घेण्यात आला. मात्र, पुरेशी संधी देऊनही प्रतिवादीचा उलटतपास घेतला नाही म्हणून दि. ०४/०३/२०२४ रोजी वादीविरुध्द पुन्हा प्रतिवादीचा उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. तदनंतर प्रतिवादीतर्फे साक्षीदार नं. ३ सचिन आनंदा पाटील यांची साक्ष देखील दि. २०/०७/२०२४ रोजी नोंदविण्यात आली.

**५.** दि. १०/०२/२०२५ रोजी प्रतिवादीतर्फे तोंडी पुरावा देण्याचा नाही म्हणून पुरसीस नि.क्र. १०५ देण्यात आली. तदनंतर प्रकरण युक्तिवादासाठी नेमले असताना दि. २१/०७/२०२५ रोजी वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला. निश्चितच वादीतर्फे प्रतिवादीचा उलटतपास घेणेस व प्रस्तुतचा अर्ज देणेस विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वादीने अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी, निरंतर व मॅण्डेटरी मनाई मिळणेसाठी, दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये वादी, प्रतिवादीचे देखील हक्क हितसंबंध आहेत. त्यामुळे वादी यांना प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे

न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादीस पुरेशी संधी देऊनही त्यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केलेले नाही. वादींना यापुर्वी दिलेल्या संधीचा तसेच झालेला विलंब विचारात घेता वादींनी खर्च रक्कम रु. १,०००/- तालुका विधी सेवा समिती शिराळा येथे भरणेच्या अटीवर अर्ज मंजूर केल्यास न्यायोचित होणार आहे. त्यामुळे उभय पक्षांपैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली करणेस मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

वादी यांनी खर्च रक्कम रु. १,०००/- तालुका विधी सेवा समिती शिराळा येथे भरणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM

Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2025.12.08 18:16:28 +0530

शिराळा (व्ही. ए. देसाई)

दिनांक ०८/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar (Steno, Grade-3) |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 08/12/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 08/12/2025 |
| Order uploaded on | : | 09/12/2025 |